# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर

**(गृह शाखा)**

**दुरध्वनी क्रमांक** - 0217- 2731020 **ई मेल** - dcbsolapur@gmail.com

---

वाचा :- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक २२.०३.२०२०, दिनांक २३.०३.२०२०, दिनांक २८.०३.२०२०, दिनांक १४.०४.२०२०, दि.१९.०४.2020 दि.०३.०५.२०२०, दि. ०४.०५.२०२०, दि. ०५.०५.२०२०, दि. ०७.०५.२०२०, दि. १७.५.२०२०, दि. २०.५.२०२०, दि. २२.५.२०२०, दि. ३१.६.२०२०

२) भारतीय साथरोग प्रतिबंध कायदा १८९७

३) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५.

४) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना २०२०/ प्रक्र.५८/ आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०.

५) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक २५.०३.२०२०, दि. १५.०४.२०२०, दिनांक १७.०४.२०२० व दि.१८.०४.२०२०, दि.०२.०५.२०२०, दि. ०३.०५.२०२०, दि. १७.०५.२०२०, दि. १९.०५.२०२०, दि. २१.०५.२०२०, दि. ३१.५.२०२०, दि. २५.६.२०२०

---

जा. क्र. २०२०/डिसीबी-०२/आरआर/ २५७१ दिनांक :- २६/०६/२०२०

**विषय :- फौजदारी प्रक्रिया दंड संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार सोलापूर जिल्ह्यात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.**

<u>सुधारित आदेश :-</u>

ज्या अर्थी, सोलापूर जिल्ह्यात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपरोक्त क्र. १ मधील या कार्यालयाचे आदेश दिनांक ३१ मे, २०२० अन्वये, सोलापूर जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) काढलेले प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

तसेच ज्या अर्थी, शासनाकडील दिनांक ३१.०५.२०२० मधील निर्देशास अनुसरुन उपरोक्त क्र. ५ अन्वये, महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनचा कालावधी दिनांक ३०.०६.२०२० पर्यंत वाढविण्यात आलेला आहे.

तसेच ज्या अर्थी, शासनाकडील दिनांक २५.०६.२०२० मधील निर्देशास अनुसरुन उपरोक्त क्र. ५ अन्वये, सुधारित सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्या अर्थी, मी मिलींद शंभरकर, जिल्हादंडाधिकारी सोलापूर, फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये सोलापूर जिल्ह्यात (पोलिस आयुक्तालय हद्य वगळून) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने यापूर्वी काढलेले संदर्भ क्र. १ मधील आवश्यक लागू असलेले प्रतिबंधात्मक आदेश कायम ठेवून शासनाच्या दिनांक २५.०६.२०२० रोजीच्या नवीन सुधारित सुचना नुसार प्रतिबंधीत सांसर्गीक क्षेत्र (Containment Zone) वगळुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**१) यापुर्वीच्या दि.३१.०५.२०२० रोजीच्या आदेशातील कलम क्र.७(vii) मध्ये पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.**

**Vii) महाराष्ट्र शासनाने ज्या केश कर्तनालये, स्पा,सलून,ब्युटी पार्लर यांना परवानगी दिलेली आहे.अशीच केश कर्तनालये, स्पा, सलून, ब्युटी पार्लर चालू रहातील व इतर केश कर्तनालये,स्पा,सलून,ब्युटी पार्लर दि.३१.०५.२०२० रोजीच्या आदेशानुसार प्रतिबंधीत असतील.**

२) यापुर्वीच्या दि ३१.०५.२०२० रोजीच्या आदेशातील कलम क्र.६ मध्ये यापुर्वी दिलेल्या परवानगी दिलेले उपक्रम चालू ठेवून त्यामध्ये पुढील प्रमाणे खालील उपक्रम जोडण्यात येत असून त्याची अमंलबजावणी दि २७.०६.२०२० पासून होईल.

viii) केश कर्तनालये ,स्पा,सलून,ब्युटी पार्लर,चालू करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

- यामध्ये केवळ निवडक सेवा जसे हेअरकट,हेअरडाय,वॅक्सींग इत्यादीना परवानगी देण्यात येत आहे.तथापि त्वचेशी संबधीत सेवा (दाढी,फेशियल,मशाज इ.)देण्यास तुर्त परवानगी देण्यात येत नाही. या सेवा दिल्या जाणार नाहीत असा फलक दुकानाच्या बाहय दर्शनी भागात ठळक पणे दिसतील अशा रितीने लावण्यात यावा.
- या ठिकाणी काम करणाऱ्या चालक/कर्मचाऱ्यानी स्वत:चे संरक्षण करण्यासाठीग्लोव्हज,ॲप्रन,व मास्कचा वापर करावा
- सदरचे कामाचे ठिकाण (खुर्च्या इ.) प्रत्येक वेळी सेवा दिल्या नंतर निर्जंतुक करावेत. दुकानातील वापरातील भाग व जमिनीचा पृष्ठ भाग प्रत्येक २ तासानी निर्जंतुक करावा.
- ग्राहकासाठी डिस्पोजेबल टॉवेल/नॅपकीन याचा वापर करावा. नॉनडिस्पोजेबल साधने प्रत्येक वापरानंतर स्वच्छ व निर्जंतुक करावीत.
- प्रत्येक दुकानाच्या दर्शनी भागावर उपरोक्त माहिती बाबतच्या सुचना ग्राहकाच्या महितीसाठी प्रदर्शीत कराव्यात.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती / संस्था अथवा संघटना भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१, ५५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल.तसेच सदर आस्थापनेचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

(मिलिंद शंभरकर,भा.प्र.से.)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर

**प्रत- माहीतीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त पुणे.

**प्रत - आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. पोलिस आयुक्त सोलापूर शहर
२. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
३. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
५. अधिष्ठाता,डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैदयकिय महाविद्यालय सोलापूर.
६. जिल्हा शल्य चिकीत्सक, सोलापूर
७. जिल्हा अधिक्षक कृषी,सोलापूर
८. सर्व उपविभागीय दंडाधिकारी ---------------
९. उपनिबंधक सहकारी संस्था

१०. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ------------

११. जिल्हा प्रशासन अधिकारी (न.पा.शाखा),जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

१२. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर

१३. सहायक कामगार आयुक्त, सोलापूर

१४. जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर

१५. केंद्र संचालक आकाशवाणी केंद्र सोलापूर यांना प्रसिध्दीस्तव.

१६. राष्ट्रीय सुचना-विज्ञान केंद्र (NIC) जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर